# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

Volume V, Issue I | ISSN : 2350-0476 (Online) 2394-207X (Print) IMPACT FACTOR : 4.205 | January 2018

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

ijmms

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

# Index


| Sr. | Name of the Paper | Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Study of Entrepreneurship Development and Start-Ups in India | Dr. Mohan K. Choudhari | 1-6 |
| 2. | Developing Economies in Globalization | Dr. Samadhan K. Patil | 7-10 |
| 3. | Globalization and Food security in India: with special ref. to Anna Bhagya Yojana in Kranataka | Rajeeyabegam A. Tegginamani | 11-21 |
| 4. | UV-Visible absorption Studies of Copper Phthalocyanine, Nickel Phthalocyanine, Cobalt Phthalocyanine, Zinc Phthalocyanine and Iron Phthalocyanine | [1]Ashok Datir<br>[2]Sanjay Chakane | 22-26 |
| 5. | Structural, Dielectric, Magneto-dielectric, and Ferroelectric Properties of BST-CNFO Multiferroic Composite | [1]Sagar M. Mane<br>[2] Shrinivas B. Kulkarni | 27-34 |
| 6. | Class and Caste based Cultural Hegemony in *Kanyadan* | [1]Dr. Anil Gaman Ahire<br>[2]Dr. P. R. Bhabad | 35-39 |
| 7. | Post-Colonialism: Theoretical Perspectives | Dr. Ashutosh Thakare | 40-43 |
| 8. | Recent Trends in Economics: Especial Reference to Implementation of GST in India and Its Impact on SME Sector | Dr. S. K. Dhage | 44-48 |
| 9. | Women Empowerment in Shobha De's *Starry Nights* and Manju Kapur's *Difficult Daughters* | Dr. Vijay D. Songire | 49-53 |
| 10. | Pragmatic Study of Non-Linguistic Features in Absurd Drama | Dr. Samadhan S. Mane | 54-56 |
| 11. | A Study of Contribution of Indian professors in Indian Literary Criticism | Dr. Sankla Mahavir | 57-60 |
| 12. | Web Based Evaluation of University Library Web OPACs of Maharashtra | [1]Sadanand Y. Bansode<br>[2]Vijaykumar K. Jagtap | 61-68 |
| 13. | Challenges for Library Professionals in the age of MOOC | [1]Priyanka V. Naikwadi<br>[2]Dr. Shivshankar Ghumre | 69-72 |
| 14. | Utilization of FREE / Open Access Online Resources | Dr. Prakash B. Bilawar | 73-76 |
| 15. | Recent Trends in Business Communication – A Conceptual study | Omkar Suhas Tembe | 77-79 |
| 16. | Booming Trends in Commerce Education | Dr. Shreya Vinay Patil | 80-83 |
| 17. | A Study Role of District Planning in Rural Development | Mr. Suryakant P. Mane | 84-88 |
| 18. | Emerging Trends of E-Commerce in India | Prof. Bhaskar J. Raskar | 89-99 |
| 19. | MATHEMATICAL MODELING OF PERFORMANCE BASED ANALYSIS OF AN INTEGRATED CELLULAR AND AD HOC RELAY SYSTEM | Dr. SUNIL G. PURANE*<br>GHULE DILIP BAPURAO** | 100-119 |
| 20. | थेट परकीय गुंतवणूक आणि भारत | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 120-124 |

VOLUME-V, ISSUE-I ISSN (Online): 2350-0476 ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# थेट परकीय गुंतवणूक आणि भारत

डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल
राज्यशास्त्र विभाग, सहयोगी प्राध्यापक,
श्री पद्ममणी जैन महाविद्यालय, पाबळ

विकसित, विकसनशील, अविकसित अशा कोणत्याही देशाला आर्थिक विकासासाठी अधिक भांडवलाची गरज असते. परंतु देशात राष्ट्रीय उत्पन्न मर्यादित असल्याने देशातील लोकांची बचत मर्यादित असते, त्यामुळे देशात भांडवल निर्मितीचा वेग कमी राहून त्याचा देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. परंतु देशातील औद्योगिक व इतर क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. यासाठी देशाबाहेरून आलेल्या विदेशी भांडवलाचे स्वागत करणे आवश्यक असते. सर्वसाधारणपणे या विदेशी भांडवलाचे दोन प्रकार पडतात - 1. विदेशी प्रत्यक्ष भांडवल आणि 2) विदेशी गुंतवणूक संस्था.

विदेशी गुंतवणूक - देशाबाहेरून आलेले भांडवल म्हणजे विदेशी गुंतवणूक. काही देशांच्या सरकारकडे, उद्योजकांकडे, संस्था व बँकांकडे मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध असते या भांडवलाचा वापर देशात करता येतो. तसा तो इतर देशात ही करता येतो. हे भांडवल जेव्हा विदेशात उद्योग व्यापारासाठी किंवा निव्वळ उत्पन्न मिळविण्यासाठी गुंतविले जाते तेव्हा त्याला विदेशी गुंतवणूक म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील देशात होणाऱ्या विदेशी गुंतवणूकी पैकी सुमारे 15 % गुंतवणूक एकट्या अमेरिकेकडून होत होती. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर इतर अनेक देश अन्य देशात गुंतवणूक करू लागले.

विदेशी थेट गुंतवणूक एफ.डी.आय. म्हणजे सर्वसाधारणपणे विदेशी थेट अथवा प्रत्यक्ष गुंतवणूक होय. एका देशातील कंपनी जेव्हा दुसऱ्या देशात कारखाना उभारण्यासाठी प्रत्यक्ष गुंतवणूक करते तेव्हा त्या गुंतवणुकीला थेट विदेशी गुंतवणूक म्हणतात. थोडक्यात दुसऱ्या देशात प्रत्यक्ष उत्पादनासाठी, उद्योग संस्थेच्या स्वरूपात केलेल्या गुंतवणुकीला विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणतात. अशी गुंतवणूक केल्याने एका देशातील गुंतवणूक संस्थेला विदेशी संस्था किंवा कंपनीशी संबंध प्रस्थापित होतो. प्राथमिक भांडवल बाजाराद्वारे ही गुंतवणूक केली जाते किंवा भाग भांडवल खाजगीरीत्या घेऊनही अशी गुंतवणूक करता येते. सातत्याने होणारी आर्थिक वाढ, गुंतवणूक विषयक उदार नियम, उद्योगातील लवचिक धोरण या घटकांमुळे विदेशी थेट गुंतवणुकीत वाढ होते. विदेशी थेट गुंतवणूक दोन प्रकारे केली जाते, देशाबाहेर जाणारी थेट



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

विदेशी गुंतवणूक आणि देशात येणारी थेट विदेशी गुंतवणूक . सरकारच्या धोरणावर या दोन्ही प्रकारच्या गुंतवणुका अवलंबून असतात. करातील सूट, व्याजदर, शासनाने निश्चित केलेली गुंतवणूक प्रक्रिया, शासनाची अनुदाने, सहाय्य, गुंतवणूक रकमेवरील मर्यादा , इत्यादी काही घटक यात येतात. कोणत्याही देशात प्रत्यक्ष थेट गुंतवणूक करण्यामागे काही उद्देश असतात. सध्या उत्पादन करत असलेल्या उत्पादनांना नवीन बाजारपेठा उपलब्ध करुन देणे, उत्पादनाचे सरसकट जमीन भांडवल शोधून त्याचा वापर अधिक नफ्यासाठी करणे, कंपनीकडे असलेल्या उत्पादन मित्रण संशोधन इत्यादी कार्यक्रम, तिचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी विदेशी थेट गुंतवणूक केली जाते. तसेच इतर देशातील श्रमिकांच्या कमी खर्चाचा फायदा घेणे आणि आपल्या देशात गुंतवणूक वळवणे.

प्रत्यक्ष गुंतवणूकीचे काही फायदे - देशाचा आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी देशात पुरेसे भांडवल नसेल तर विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन देशाचा आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. थेट विदेशी गुंतवणुकीचे काही फायदे प्रत्यक्ष स्वरूपात दिसतात. उदाहरणार्थ औद्योगिक विकासाला चालना मिळते, पायाभूत आणि मोठे उद्योग उभारण्याला अर्थ सहाय्य मिळते, विदेशी तंत्रज्ञान व व्यवस्थापन देशात आल्याने वस्तूचा दर्जा वाढतो, नवीन रोजगारं निर्मितीस चालना मिळते, देशातील बेरोजगारी कमी होते, मजुरीचे दर वाढवून लोकांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते, आणि लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो, देशाची निर्यात क्षमता वाढते. परंतु याबरोबरच अशा प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे काही नुकसान -तोटे देखील होतात. जसे स्थानिक उद्योगांशी स्पर्धा वाढवून त्याचा प्रतिकूल परिणाम देशातील उद्योगांच्या विकासावर होताना दिसतो. स्थानिक उद्योगांचा बाजारपेठेतील हिस्सा कमी होतो, विदेशी गुंतवणूकदारांनी कमावलेला नफा देशातून बाहेर जातो, तो नफा स्थानिक उद्योगांनी कमावला असता तर तो देशातच राहिला असता आणि भांडवल उभारणीसाठी त्याचा उपयोग झाला असता. परंतु असे होताना दिसत नाही. किरकोळ क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीमुळे या क्षेत्रातील अनेक व्यवसाय बंद पडतील त्यामुळे देशातील लहान उद्योगांचे भवितव्य धोक्यात येऊन मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढू शकते. विदेशातील कंपन्या भांडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने भारतीय कंपन्यांपेक्षा सक्षम आणि प्रबळ आहेत त्यामुळे किरकोळ क्षेत्रातील थेट गुंतवणुकीमुळे त्याचे आर्थिक क्षेत्रातील प्राबल्य वाढू शकेल. असे झाल्यास या कंपन्या भारताच्या अर्थकारण आणि राजकारणात हस्तक्षेप करू शकतात. 1991 मध्ये भारतात नवे आर्थिक धोरण स्वीकारले गेले. यातून जागतिकीकरण, उदारीकरण, परकीय गुंतवणूक, परकीय भांडवल , खाजगीकरण या घटकांना महत्त्वाचे स्थान मिळाले. तत्कालीन सत्ताधारी काँग्रेस पक्षाने भारतीय



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

अर्थव्यवस्थेला उच्च स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस पक्षाच्या कार्यकाळात थेट परकीय गुंतवणुकीला चालना मिळाली परंतु परकीय गुंतवणुकीला चालना देणे न देणे हे त्या- त्या देशाच्या राजकीय नेतृत्व स्थितीवर अवलंबून असते. काँग्रेसने भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी थेट परकीय गुंतवणुकीला महत्त्व दिल्याने परकीय गुंतवणुकीमध्ये नवीन बाजारपेठांचा शोध, नव्या संसाधनांचा शोध, कार्यक्षमतेचा विकास, इतर देशातील श्रमिक कमी खर्चात मिळविणे आणि गुंतवणूक वळविणे यांचा समावेश असतो. थेट परकीय गुंतवणुकीत नवीन उत्पादन सुरू करण्याला प्राधान्य असते. थेट परकीय गुंतवणुकीतून आंतरराष्ट्रीय व्यापार, ज्ञान, कौशल्य, आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण होत असते. आर्थिकस्तर उंचावणे व आर्थिक विकास या राष्ट्राच्या प्रगतीसाठी हितकारक असतो. थेट परकीय गुंतवणूक ही सुरक्षित आंतरराष्ट्रीय भांडवल समजली जाते. भारतातील व्यावसायिक क्षेत्रात देखील थेट परकीय गुंतवणूक महत्त्वाची मानली जाते. बांधकाम क्षेत्र, दळणवळण माहिती, तंत्रज्ञान व संगणकक्षेत्रा बरोबरच इतर क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण वाढण्यास सुरुवात झाली आहे . यानुसार एखाद्या देशाची आर्थिकस्थिती सुधारणेमध्ये त्या देशातील राजकीय सत्तेत असणाऱ्यांचा मोलाचा वाटा असतो.

परकीय थेट गुंतवणुकीचे काही परिणाम- देशातील विविध क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीत अधिक शिथिलता आणल्यामुळे त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर व विशिष्ट क्षेत्रावर परिणाम झालेली दिसतात. अर्थव्यवस्थेच्या प्रमुख तीन क्षेत्रांमधील बंधने मुक्त केल्याने होणाऱ्या परिणामांची चर्चा होताना दिसते. उदाहरणार्थ दूरसंचार क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, रिटेल क्षेत्र, या तीन क्षेत्रात एफ.डी.आय.चे दूरगामी परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक दृष्ट्या झालेले दिसतात. दूरसंचार क्षेत्रात परकीय थेट गुंतवणूक एकूण 74 % होते. त्यापैकी 49% ऑटोमॅटिक रूट व उर्वरित एफ. आय. पी. बी. च्या मंजुरीने अशी होती. परंतु नवीन मंजुरी व निर्णयानुसार 100% ऑटोमॅटिक मार्गाने करण्यास शासनाने मंजुरी दिली. याचे सकारात्मक परिणाम परदेशी दूरसंचार कंपन्यांना झाला. आता भारतात गुंतवणुकीसाठी भारतीय कंपनीची भागीदारी करण्याची गरज राहणार नाही. दूरसंचार क्षेत्रातील देशाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचण्यासाठी अधिक गुंतवणूक प्राप्त होईल. नवीन 3 जी ब्रोडबंड वायरलेस ऍक्सेस सेवा पुरविणे शक्य होईल. यामुळे देशातील जनतेला वेगवेगळ्या सेवांचा आणि शासनाला लायसन्सचा लाभ होईल. दूरसंचार कंपन्याचा व्यवहार अधिक पारदर्शक होईल. या सकारात्मक परिणाम बरोबरच काही नकारात्मक परिणाम देखील झालेले दिसतात. भारतातील संपूर्ण दूरसंचार नेटवर्कवरील परदेशी कंपन्यांचे नियंत्रण वाढेल त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. माहिती सुरक्षितता आणि गोपनीयतेवर अडचणी निर्माण होण्याची

शक्यता आहे. त्यावर आळा बसणे कठीण होईल. दूरसंचार क्षेत्राबरोबरच संरक्षण क्षेत्रावर देखील एफडीआयचे काही सकारात्मक परिणाम झालेले दिसतात. संरक्षण मंत्री ए के अँटनी यांच्या विरोधी जाऊन संरक्षण क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक 26% वरून 49% करण्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. याचे सकारात्मक परिणाम झालेले दिसतात. नवीन तंत्रज्ञान, मोठ्या यंत्रणेचे सुटे भाग परदेशातून आयात करावे लागतात यास आवश्यकतेपेक्षा जास्त पैसे मोजावे लागतात. परंतु ते उत्पादन देशात केल्यास अनावश्यक खर्च आणि त्यातील होणारा भ्रष्टाचार थांबेल. तसेच सरकारच्या भांडवली खर्चात बदल होईल. जागा खरेदी, उद्योगांची उभारणी, कच्चा माल, तंत्रज्ञ यासाठी लागणारा वेळ वाचेल, आणि उत्पादन वाढेल. संरक्षण खात्याला विविध प्रकारची शस्त्रास्त्रे, साधने, उपकरणे यांची आवश्यकता असते त्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज असते. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांना प्रोत्साहन दिल्यास फायदेशीर ठरणार आहे. रिटेल क्षेत्रात परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत झालेले परिणाम पाहता शासनाने मल्टिब्रँड रिटेलमध्ये 51% आणि सिंगल ब्रँड रिटेल साठी 100,% एफडीआयची मान्यता दिली आहे. सिंगल ब्रँड रिटेल मध्ये 51% ऑटोमॅटिक कर उठणे आणि उर्वरित 51% एफ आय पी बी  चा मंजुरीने गुंतवणुकीची परवानगी दिली. किमान दहा लाख लोकसंख्येच्या शहरात गुंतवणुकीला मान्यता देऊन कमीत कमी दहा कोटी अमेरिकन डॉलर एवढी गुंतवणूक करणे अनिवार्य केले. एकूण गुंतवणुकीच्या 30 % आनी स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी करणे आणि शेतकऱ्याकडून माल खरेदीचा अधिकार प्रथम शासनाकडे असेल अशा काही अटी टाकल्याने मल्टी ब्रँड रिटेल क्षेत्रात एफ बी आय मान्यता देऊन देखील वॉलमार्ट टेस्को या मोठ्या कंपन्यांनी भारतात शिथिलता आणण्याचा विचार केला. रिटेल क्षेत्रात जगभरातील मोठ्या कंपन्या भारतात गुंतवणुकीसाठी आकर्षित होते. वस्तूंच्या किमती कमी होऊन देशाच्या अर्थव्यवस्थेवरील महागाईचा ताण कमी होईल. साधारणपणे 80 लाख व्यक्तींना रोजगार उपलब्ध होईल अशा रीतीने या अटी रिटेल क्षेत्रावर टाकण्यात आल्या. थोडक्यात एफ.डी.आय.मुळे भारताच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त झाली. भांडलाविना जो भारताचा औद्योगिक विकास खुंटला होता तो क्रियाशील झाला.  भारतातील सेवाक्षेत्राला विकासाची दिशा मिळाली. बांधकाम आणि दूरसंचार क्षेत्रात फार मोठी गती मिळाली.  दूरसंचार क्षेत्रात झालेली मोबाईल क्रांती हा एफडीआयचा परिणाम आहे. एफ डी आय मधील फेरा या कायद्यातील तरतुदीनुसार थेट परकीय गुंतवणुकीवर आरबीआयचे नियंत्रण काही प्रमाणात अबाधित असून, भारतीय सार्वभौमत्वाला कोणताही धोका दिसून येत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमाण वाढले आहे. परंतु  बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अपेक्षित परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा पडलेला नाही. भारतात गुंतवणूक करणाऱ्या



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

देशांमध्ये मॉरिशस या देशाचा वाटा सर्वाधिक असून अमेरिका दुसर्या क्रमांकावर आहे ,असे असले तरी या ठिकाणी मॉरीशसची गुंतवणूक ही अमेरिकेची गुंतवणूक असून ते कर टाळण्यासाठी मॉरिशसच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे अमेरिकेचे अर्थकारण दिसते, महाराष्ट्र राज्यातील थेट परकीय गुंतवणुकीचा सर्वाधिक ओघ माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात असून त्याचे सर्वाधिक वाटा अमेरिकेचा आहे. किरकोळ व्यापार क्षेत्रातील एफडीआयला परवानगी दिल्यामुळे शेतकरी-रिटेल कंपन्या-ग्राहक अशी नवीन साखळी तयार झालेली दिसते आणि दलाल पद्धतीला फाटा मिळालेला दिसतो.

संदर्भसूची -

1. डॉ. गोविलकर विनायक, आर्थिक संकल्पना,
2. भोळे भा.ल. आधुनिक भारताचा राजकीय विचार,
3. साठे मधुसूदन, भारताच्या आर्थिक समस्या भाग-2 ,
4. अर्थसंवाद- 2013
5. जाधव तुकाराम , महाराष्ट्र वार्षिकी- 2012 ,युनिक अकॅडमी,
6. कोळंबे रंजन, भारताची अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन,
7. देसले, दीपस्तंभ,
8. देशपांडे श्रीधर ,भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण आणि विकास, हिमालय पब्लिशिंग हाऊस,

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.